REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# वर्धा जिल्हयातील पंचायतराज व्यवस्था व स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदाधिकाऱ्याचे समाजिक व आर्थिक अध्ययन

डॉ. अनिल वि. सुरकार
व्यवसाय व्यवस्थापन व प्रबंधन विभागप्रमुख
लोक महाविद्यालय, वर्धा

## सारांश

प्रत्येक संशोधनात संशोधकाचे पहिले कर्तव्य हे असते की, आपल्या संशोधनाविषयी माहिती घेणे, जसे लोकसंख्येचा आकार, उपलोकसंख्या कशाप्रकारे आहे यावर आधारलेले असावे. प्रस्तुत अध्ययन हे वस्तुनिष्ठ असावे या संदर्भात काळजी घेतली आहे. प्रस्तूत अध्ययनात वर्धा जिल्हयातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्याची समाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यास करण्यात आला आहे.



## प्रस्तावना

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थेला फार महत्त्वाचे स्थान राहिलेले आहे. पंचायत संस्था ह्या खेड्यातील कारभार समर्थपणे राबवित असत. त्या काळात खेडे हेच शासनाचे प्रमुख केंद्र म्हणून परिचित होते. खेड्यांचे किंवा गावाचे संरक्षण करुन आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे. न्यायनिवाडा तसेच समूह व गावच्या उपयोगी व्यवस्था हाताळण्यासाठी पंचायतीचा उगम प्राचीन काळापासून झालेला आढळून येतो. पंचायत व्यवस्था ही समुदायातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, जीवनाचा एक भाग म्हणून सदैव कार्यरत राहिलेली आहे. त्यांच्या स्वरूप व कार्यामध्ये काळानुरूप बदल घडून आले. तरी वर्तमान काळातील स्थानिक स्वराज्य संस्था ही प्राचीन काळातील स्थानिक शासनाची परंपरा किंवा प्राचीन 'पंचायत व्यवस्थेचे अद्यावतरूप जरी नसले तरी त्यावर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वरूप असल्याचे दिसून येते. त्या काळी स्थानिक स्वराज्य संस्था असा उल्लेख आलेला नसला तरी त्या त्या काळात त्यांचा उल्लेख वेगवेगळ्या अर्थातून व संज्ञातून आलेला आढळतो.

प्रस्तुत प्रकरणात स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय व ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्वातंत्र्यपूर्व व नंतरची स्थानिक स्वराज्य संस्था,

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय व विकास यांचा आढावा, स्थानिक स्वराज्य संस्था संकल्पना, व्याख्या, रचना, स्वरूप, कार्य, उद्देश व महत्त्व, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यांची रचना, स्वरूप, कार्य इत्यादीचा आढावा यात घेण्यात आलेला आहे.

वरिल बाबी लक्षात घेता, **वर्धा जिल्हयातील पंचायतराज व्यवस्था व स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदाधिकाऱ्याचे समाजिक व आर्थिक अध्ययन** या शिर्षकाअंतर्गत हे संशोधन कार्य करण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १: पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्याचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनूसार वर्गीकरण**

| **शिक्षण** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| निरक्षर | २ | ०.६ |
| प्राथमिक | २३ | ७.० |
| माध्यमिक | ११९ | ३६.१ |
| उच्च माध्यमिक | १३३ | ४०.३ |
| स्नातक | ३७ | ११.२ |
| स्नाकोत्तर | १० | ३.० |
| इतर | ६ | १.८ |
| **एकूण** | **३३०** | **१००** |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनूसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ०.६ टक्के पदाधिकारी निरक्षर असून ७.० टक्के पदाधिकाऱ्यांने प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते. तसेच ३६.१ टक्के, ४०.३ टक्के व ११.२ टक्के अनुक्रमे पदाधिकाऱ्यांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व स्नातक स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते. त्याचप्रमाणे ३.० टक्के अधिकाऱ्यांनी स्नातकोत्तर स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले असून १.८ टक्के पदाधिकाऱ्यांनी इतर स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते.

म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिकलेल्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेसंबंधी माहिती**

| **गावात/शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेचे सदस्यत्व** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १०८ | ३२.७ |
| नाही | १२२ | ६७.३ |
| **एकूण** | **३३०** | **१००** |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ३२.८ टक्के पदाधिकारी त्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेत सदस्य होते. तसेच ६७.२ टक्के पदाधिकाऱ्यांची त्यांच्या गावात अथवा शहरातील सामाजिक संस्थेत सदस्यता नव्हती.

म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये गावात अथवा शहरातील सामाजिक संस्थेत सदस्य नसणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

### सारणी क्रमांक ३: पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी माहिती

| **या संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अंशत: | १९६ | ५९.४ |
| पुर्णत: | १०८ | ३२.७ |
| मुळीच नाही | २६ | ७.९ |
| **एकूण** | **३३०** | **१००.०** |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५९.४ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अंशत: प्रयत्न केले जाते तर ३२. ७ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी पुर्णत: प्रयत्न करण्यात येते. तसेच ७.९ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत नाही.

म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ४: सामाजिक विकासात असलेल्या स्वत:च्या सहभागाच्या प्रमाणासंबंधी पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांची प्रतिक्रीया**

| **सामाजिक विकासात असलेल्या सहभागाचे प्रमाण** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अंशत: | १८७ | ५६.७ |
| पुर्णत: | १४३ | ४३.३ |
| लागू होत नाही | – | – |
| **एकूण** | **३३०** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ३१६.८१ | २ | <0.05 |

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांची सामाजिक विकासात असलेल्या स्वत:च्या सहभागाच्या प्रमाणासंबंधी प्रतिक्रीया दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५६.७ टक्के पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा सामाजिक विकासात अंशत: सहभाग होता. तसेच ४३.३ टक्के पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा गावातील सामाजिक विकासात पुर्णत: सहभाग होता.

म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये गावातील सामाजिक विकासात अंशत: सहभाग असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष

अध्ययनातील परीणामांवरून (सारणी क्रमांक १) असे निदर्शनास येते की, वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिकलेल्या पदाधिकाऱ्यांची संख्या महत्वपुर्णपणे अधिक आहे व ८४.० टक्के पदाधिकाऱ्यांचे शैक्षणीक स्तर स्नातक स्तरापेक्षा कमी आहे. तसेच केवळ ३२.७ टक्के पदाधिकारी त्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेत सदस्य आहेत (सारणी क्रमांक २). ५९.४ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अंशत: प्रयत्न केले जाते (सारणी क्रमांक ३). ५६.७ टक्के पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा सामाजिक विकासात अंशत: सहभाग होता (सारणी क्रमांक ४). या वरून असे स्पष्ट होते की वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पदाधिकाऱ्यांचा सामाजिक कार्यात सहभाग अल्प प्रमाणात आहे व महत्वपूर्णपणे अधिक पदाधिकाऱ्यांचे शिक्षण स्नातक स्तरापेक्षा कमी आहे. यावरून वर्धा जिल्ह्यातील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमधिल पदाधिकाऱ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावला नसल्यामुळे त्यांचा सामाजिक कार्यात सहभाग अल्प प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते.

## संदर्भग्रंथ सूची

१) अग्रवाल., प्र. (२००८), भारत में पंचायतराज, ज्ञानगंगा प्रकाशन, दिल्ली
२) अमृतकर., प्र. (२००१), 'चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर जिल्ह परिषद तसेच चंद्रपूर, वरोडा व राजूरा पंचायत समित्या अंतर्गत पंचायत राज संस्थामधील सदस्य व पदाधिकारी स्त्रियांचा सहभाग व भूमिकेबाबत अध्ययन' पी एच. डी. प्रबंध, नागपूर विद्यापीठ.
३) कश्यप., अ. (२०१०), भारत में पंचायतीराज, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राईवेट लिमिटेड, नई दिल्ली.
४) कऱ्हाळे, वि., (२०११), नांदेड लिल्हा परिषदेतील आदिवासी नेतृत्वांचा अभ्यास, शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
५) शर्मा., म. आणि शुक्ला, र. (२०११), 'पंचायतराज व्यवस्था नवीन ग्रामीण नेतृत्व का अविर्भाव', संपादक पी. पी. गौर, आर. के. मराठा अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, २०११, पृ. क्र. ५८ ते ६७.
६) कुलकर्णी., ए.एम. (२००१), भारतातील स्थानिक शासन, मधुरा प्रकाशन, सांगली.
७) भोगे., कृ. (२०१५), महानगरपालिका प्रशासन, सकाळ करिअर मंत्र, दैनिक सकाळ, औरंगाबाद.
८) कौटिल्यीय अर्थशास्त्रम, चौखम्बा विद्या भवन, वाराणसी प्रथम अध्याय १७ वॉ प्रकरण.
९) क्रोस., से. (१९२२), द डवेलपमंटे ऑफ सेल्फ गवर्नमेंट इन इंडिया, शिकागो युनिवर्सिटी प्रेस शिकागो
१०) कोतवाल आणि लेले (२००२), प्रतिनिधित्व राखीव जागा आणि स्त्रिया, प्रकाशबाळ, किशोर बेडकिहाड (संपा.) भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रीया आणि स्वरूप, आंबेडकर अकादमी सातारा, पृ. क्र. २०९
११) कुळकर्णी आणि श्रीनिवास (२००८), पंचायतराजची पंधरा वर्ष अवकाश कमी अडथळे जास्त, परिवर्तनाचा वाटसरू, पृ १०-१३.
१२) कोलते., पु.ये., (२००६), 'औरंगाबाद जिल्ह्यातील पंचायत राजव्यवस्थेत महिलांचा सहभाग' (१९९१ ते २००१) पीएच्.डी. शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.